RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १२, अंक - ५ ] सोमवार, मे २२, २०२३ / ज्येष्ठ १, शके १९४५ [ पृष्ठ १

## असाधारण क्रमांक ५

## प्राधिकृत प्रकाशन

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांजकडून**

**प्रपत्र ड**

**शुद्धिपत्रक**

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुका**

क्रमांक एसईएम/कावि/२०६/२०२२/कावि/५५/शुद्धिपत्रक/२०२३.-- पुणे जिल्ह्यातील एकूण ५५ गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारप्राप्त व्यक्तींची " विशेष कार्यकारी अधिकारी " म्हणून नियुक्ती वरील आदेशान्वये करणेत आली आहे, त्याची प्रसिद्धीही महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-एक, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक १६ डिसेंबर २०२२ रोजी पृष्ठ क्रमांक ४ वर प्रसिद्ध झाली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक विकाअ-१११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर २०१५ तसेच दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ६.५ मध्ये " गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार " या पुरस्कारप्राप्त व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती ही त्यांच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत चालू राहील व वयाच्या ७० वर्षांनंतर त्यांना अनर्ह ठरविण्यात यावे, असे नमूद केले आहे. परंतु दिनांक ९ डिसेंबर २०२२ चे आदेशामध्ये विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती ही निर्गमित केलेल्या आदेशापासून पुढील पाच वर्षापर्यंत अस्तित्वात राहील, असे नमूद केले आहे. त्यामुळे दिनांक १६ डिसेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत येत आहे.

गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारप्राप्त व्यक्तींची " विशेष कार्यकारी अधिकारी " म्हणून नियुक्ती ही त्यांच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत चालू राहील व वयाच्या ७० वर्षांनंतर त्यांना अनर्ह ठरविण्यात येईल अथवा पुढील आदेश होईपर्यंत अस्तित्वात राहील.

**डॉ. राजेश देशमुख,**
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
पुणे.

पुणे, ९ मे २०२३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.